शोध प्रबंधाचा आराखडा

“ नांदेड जिल्हयातील नागरीकरणाचा भौगोलीक अभ्यास ”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या भूगोल विषयातील विद्यावाचस्पती (पी.एच.डी) पदवीसाठी सादर करण्यात येणारा शोध प्रबंधाचा आराखडा

-: संषोधक :-

जलेश वसंतराव पातेकर

एम.ए.बी.एड.एम.फिल. भूगोल

-:मार्गदर्षक :-

डॉ.भगवान प्रभाकरराव शेंडगे

एम.ए..एम.फिल.पीएच.डी भूगोल

भूगोल विभाग,

बी.रघुनाथ महाविद्यालय परभणी

संशोधक केंद्र

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,नांदेड

मे २०१९

शोध प्रबंधाचा आराखडा

शोध प्रबंधाचा विषय : नांदेड जिल्हयातील नागरी करणाचा भौगोलीक अभ्यास

संशोधक **मार्गदर्षक**

जलेश वसंतराव पातेकर **डॉ. भगवान प्रभाकरराव शेंडगे**

१.१ प्रस्तावना :

नागरी भूगोल ही मानवी भूगोलाची एक शाखा आहे. नागरी भूगोलाचा आपण जेंव्हा अभ्यास करतो. तेव्हा नागरी भूगोलाचा इतिहास समजावून घेणे महत्वाचे आहे.जगात भूगोलाचा अभ्यास अनादिकाळापासुन होत असला तरी नागरी भूगोलाचे अध्ययन अलिकडे सुरू आहे. १९४० पर्यंत नागरी भूगोलाच्या अध्ययनावर फारसा भर देण्यात आला नव्हता. दुस-या महायुध्दानंतर मानवी भूगोलाचा अधिक विकास झालेला आहे.

पॅलिओलिथिक काळापासुन निओलिथिक काळापर्यंत हळुहळु बदल होत जावुन नागरी भूगोलाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. आणि त्यातुन काही नगरांचा उगम झाला आहे. मनुष्य शक्तीची जमवाजमव दीर्घ अंतरावर जाण्यासाठी वाहतुक, संदेशवहन व्यवस्थेचा विकास, नवनवीन घटनांच्या शोधांनी कृषी उत्पनातील भरतसाठ वाढ या कारणांमुळे नवीन वस्त्या स्थापन झाल्या. नगराच्या महत्वाच्या ठिकाणी ग्रामदेवता आणि स्थानीक टोळयांच्या मुख्यांचा पुतळा उभारला जात आहे. नगराचा विकास होण्यामध्ये तांत्रीक ज्ञान, राजकारण आणि धार्मिक गोष्टींचा प्रभाव पडलेला दिसत आहे.

नागरी भूगोलाचा अभ्यास नवीन असला तरी याचा अर्थ नागरी भूगोलाचा अभ्यास होत नव्हता, असे नाही प्राचीन काळात नागरी ठिकाणाच्या अभ्यासाकडे काही अभ्यासाकांचे लक्ष वेधले होते. ही गोष्ट त्यावेळी काही तज्ञानी नागरी ठिकाणांच्या केलेल्या अभ्यासावरून दिसुन येते. ‘‘स्ट्रबो’’या तज्ञांनी आपल्या Geography या पुस्तकात शहरांच्या स्थितीवर भर दिला होता. तसेच १७९३ मधील ‘‘विल्यम फ्रेडरिक मार्टीन’’ या लेखाकाने लिहिलेल्या “New system in Geography” या पुस्तकात ग्रेट ब्रिटनमधील शहरांचे वर्णन केले होते. २० च्या शतकाच्या सुरूवातीस ‘‘ बी.बी.डिस्लिन ’’ या भूगोल शास्त्रज्ञाने निरनिराळया शहरांचा सखोल अभ्यास करुन जगातील लोकांना शहरांचे दर्शन घडवून दिले. या काळात शहरांचा अभ्यास नागरी भुगोलाच्या रूपाने पुढे आला. १९०१ मध्ये ‘‘ब्लाश’’ व १९०७ मध्ये ‘‘कुर्ट हेसर्ट’’ या लेखकांने शहरावर महत्वपुर्ण लेखन केले. यांनी आपल्या लेखनात शहरांचा उगम व त्यांच्या विकासावर होणारा नैसर्गिक गोष्टींचा परिणाम या गोष्टीवर प्रकाश टाकला. १९२४ मध्ये ‘‘ओरुशा’’यांनी नागरी भुगोलाची एक व्याख्या करून नागरी भुगोल ही एक स्वतंत्र भाषा आहे. हे दाखवुन दिले. १९३८ मध्ये ‘‘क्रोबी’’या तज्ञाने नागरी भूगोलाचे क्षेत्र मजबुत झाले होते.

परंतु दुस-या महायुध्दाच्या काळात नागरी भूगोलाच्या अभ्यासावर परिणाम होवुन शहराच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष झाले. पण दुस-या महायुध्दात झाालेली शहरांची हानी व त्यानंतर औद्योगिकीकीणाला झाालेली सुरूवात यामुळे शहराच्या अभ्यासावर विशेष भर देण्यात आला – गेल्या ४० वर्षात षहरांची फारच वेगाने वाढ झालेली आहे. शहरातील वाढती लोकसंख्या व त्यामुळे भेडसावणारा जागेचा प्रश्न, तसेच बेकारी , वाहतुक,पाणी पुरवठा, प्रदुषण इत्यादी अनेक समस्यांमुळे शहरांचा अभ्यास अत्यावशक झाालेला आहे. जुण्या शहरांचा विस्तार त्यांची पुनर्ररचना, नवीन शहरांची उभारणी इत्यादी गोष्टींना महत्व झाले आहे. त्याबरोबर नागरी भूगोलाच्या अनेक महत्वपुर्ण घटकांना महत्व प्राप्त झाले आहे –

रोम साम्राज्य मध्ययुगीन काळातील महत्वपुर्ण साम्राज्य होते. आजचे पॅरीस षहर फ्रांसचे कळीज व पाठीचा कणा होउन राहीले असे वर्णन मध्ययुगातील नगर निर्मिती मध्ये पहायला मिळते. मध्ययुगीन काळात शहरातील बरेचसे लोक प्रामुख्याने व्यापारात व उद्योगधंदयात गुंतलेले होते.हीच स्थिती मध्ययुगीन नगरांच्या निर्मितीसाठी अधिकच बळकट ठरते. मध्ययुगीन काळातील नगर रचना,ग्रहरचना,रस्ते, पाणीपुरवठा व सांडपाणी व्यवस्था या भौतीक बाबी पुर्णत: प्राक्रतीक घटकावर अवलंबुन होत्या जसे नगर रचनेसाठी भुपृष्ठरचना व जमीनीचा उंचसखल पण यावरून नगर रचना ठरवता आली, घरबांधणीयाठी लागणारी मृदा, दगडांना दयावा लागणारा आकार, छातबांधणीसाठी वृक्षतोड करून गृहरचना करण्यात आली. रस्ते बांधणीसाठी कच्च्या पाउलवाटा करून या नगर वस्तीतुन दुस-या नगर वस्तीत स्थलांतरीत करणे कच्चा निर्मितीतुन षक्य झााले. ग्रामीण व नागरी विकास हा प्राचीन कालखंड, मध्ययुगीन कालखंड आणि अर्वाचीन कालखंड अषा तीन कालखडांत झाला आहे.

पुनरूज्जीवन काळातील नगररचनेचा विकास १५ व्या शतकाच्या दरम्यान नवीन रूपात मुळ रूपात धरू लागले. या काळात नगराच्या जवळपासच्या प्रदेशातील निर्वासित लोक शहरामध्ये येवुन राहीले.शहरात गर्दी वाढु लागली व लोकसंख्येच्या घनतेमध्ये ही वाढ झाली. पुनरूज्जीवन काळात कलाकुसर असलेल्या नगरांचा उदय झाला. अशा नगरांचे महत्वाचे द्योतक म्हणजे ‘‘अव्हेन्यु’’ (Avenve) होय. अव्हेन्यु म्हणजे रूंद विस्तारीत रस्ते. पुर्वीच्या नगरांमधील अरूंद गल्या व शहारातील रस्ते भव्य आणि रूंद होते. अव्हेन्यु ची रचना षहराच्या सौंदर्यात भर पाडण्याच्या दृष्टीकोनातून केलेली आहे असे प्रकर्षाने जाणवते.

१.२ अभ्यास क्षेत्र व विषय निवड :

नांदेड जिल्हा हा गोदावरी नदीच्या तीरावर वसलेला असुन महाराष्ट्राच्या दक्षिण पूर्वेस याचे स्थान आहे. नांदेड जिल्हयाचा विस्तार हा १८°१६’’ते१९°५५’’ उत्तर अक्षव्रत्त आणि ७६°५६’’ ते ७८°२२’’ पूर्व रेखाव्रत्त या दरम्यान आढळुण येतो, त्याच्या उत्तरेस यवतमाळ जिल्हा,ईशान्येस आंध्रप्रदश मधील अदिलाबाद व निजामबाद जिल्हा आहे. तसेच दक्षिणेस कर्नाटक राज्यातील ‘ बिदर हा जिल्हा आहे. नांदेड जिल्हयात एकुण १६ तालुके आहेत. जिल्हयातील प्रमुख नदी ही गोदावरी असुन मांजरा, मन्याड व पैनगंगा या देखील नद्दया जिल्हयातून वाहतात.

नांदेड जिल्हयाचे क्षेत्रफळ हे १०,५२८ चौ.कि.मी. आहे. नांदेड जिल्हयाची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार ३३,५६,५६६ इतकी आहे. हा विषय निवड प्रामुख्याने नांदेड जिल्हयातील नागरीकरणाचा भौगोलीक अभ्यास यावर आधारीत आहे. नांदेड जिल्हयात होत असलेले नागरीकरण, नगराचा प्राकृतिक आढावा, नागरीभूमीउपयोजन, नागरी वस्तीचे प्रकार, नगर निर्मिती व नागरी समस्या यांचा अभ्यास यात निवडला आहे.

१.३ संशोधनाचे महत्व :

सेशोधन म्हणजे वैज्ञानिक पध्दती प्रत्यक्ष कार्यान्वित करण्याची सुव्यवस्थीत व नियमबध्द अभ्यासक्रमाची प्रक्रिया होय. ''स्टिफन्सन'' यांनी सशोधनाची उपयोगीता स्पष्ट करतांना सांगितले की, संशोधन प्रक्रियेचे तीन पैलु आहेत. पहिला सामान्यीकरणाचा हेतुने संकल्पना व प्रतिके यांची हेतुपूर्वक हताळणी करणे, दुसरा प्रस्तापित ज्ञानातून त्यांच्या कक्षा वाढविणे, अर्थात ज्ञान प्रमाणीत करणे. तिसरा प्रमाणीत ज्ञानाचा सिध्दांत निर्मितीसाठी व व्यवहारासाठी उपयोग करणे. संशोधन करीत असतांना त्यातील जुने जे आहे त्यांचा शोध घेवुन त्यात सांख्यिकीय, भौगोलीक माहीती प्रणाली व वैज्ञानिक पध्दतीने वापर करून विषय संशोधनात बळकटी आणता येते.

१.४ संषोधनाची उद्यीष्टे:

१.नांदेड जिल्हयातील नगरांच्या वाढीचा अभ्यास करणे.
२ नांदेड जिल्हयातील नागरी लोकसंख्येच्या वितरणाचा अभ्यास करणे.
३ नांदेड जिल्हयातील ग्रामीण व शहरी लोकसंख्सेचा अभ्यास करणे.
४ नांदेड जिल्हयातील नागरी लोकसंख्येच्या वाढीचा अभ्यास करणे.
५ नांदेड जिल्हयातील नागरीभुमी उपयोजनाचा अभ्यास करणे.
६ नांदेड जिल्हयातील शहरी व नागरी भूमी विभाजनाचा अभ्यास करणे.
७ नांदेड जिल्हयातील ग्रामीण वस्तीचा अभ्यास करणे.
८ नांदेड जिल्हयातीलनगर निर्मिती व विकासाचा अभ्यास करणे.
९ नांदेड जिल्हयातील नागरी समस्या व निराकरण करणे.

१.५ संषोधनाची ग्रहतीके :

१. नांदेड जिल्हयातील नगरांची वाढ सर्वत्र सारखी आढळत नाही.
२. नांदेड जिल्हयातील ग्रामीण व शहरी लोकसंख्येत असमानता आढळते.
३. नांदेड जिल्हयातील नागरी लोकसंख्या वितरण भिन्न आढळते.
४. नांदेड जिल्हयातील भूमीचा बराच वापर कृषी, औद्योगीक, तलाव, रस्ता या साठी होतो.
५. नांदेड जिल्हयातील ग्रामीण वस्तीतुन षहरी भागात लोकांचे स्थलांतर जास्त आढळूण येते.
६. नांदेड जिल्हयातील काही नगरांचा विकास नदीच्या किनारी भागात झाला आहे.
७. नांदेड जिल्हयातील नगर वस्तीतील जमीनीवर सामाजिक नियंत्रण दिसत नाही.

१.६ आकडेवार व संकलन स्त्रोत:

१. नांदेड जिल्हयातील जनगणना अहवाल १९९१ ते २०११
२. सामाजीक व आर्थिक अहवाल नांदेड जिल्हा १९९१ ते २०११
३. नांदेड जिल्हा गॅझेटीयर १९७१ ते २०११
४. नांदेड जिल्हा सांख्यिकी अहवाल
५. नांदेड जिल्हा नगर नियोजन अहवाल
६. नांदेड जिल्हा परिषद कार्यालय, दैनिक वर्तमानपत्र, मासिके इत्यादी.

१.७ संशोधन पध्दती :

प्रस्तुत सशोधनासाठी १९९१ ते २०११ सा कालावधीचे जनगणना नकाशे पायाभूत नकाशांचा वापर करण्यात येणार आहे. सदर संषोधनात आकडेवारी गोळा करून त्याचे सादरीकरण करण्यात येणार आहे. विविध संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर होणार आहे. वरिल सर्व आकडेवारीची निरनिराळे भौगोलीक नकाषे व आकृतीसह मांडणी केल्यानंतर समग्र आकडेवारीची वर्णन भौगोलीक दृष्टीकोनातून करण्यात येईल.

भूमीउपयोजनाच्या वर्गीकरणासाठी गुगल व उपग्रहीय प्रतिमांचा वापर करण्यात येणार आहे. जी.आय.एस.चा वापर करून उपग्रह प्रतिमांचे वर्गीकरण करण्यात येणार आहे. लोकसंख्येची वार्षिक दर वाढ काढण्यासाठी खालील सुत्राचा वापर करण्यात येईल.

$$Y = \frac{(P2-P1)/t}{(p2-p1)/2} \times 100$$

$$fg = mg\left(\frac{R}{r}\right)z$$

$$fc = \frac{mv2}{r} = mv2r$$

m = उपग्रहीय वस्तुमान
r = कक्षिय त्रिज्या
v = गती
g = निरंतर गुरूत्वाकर्षण
w = कोणीय गती

$$ab^2 = ac^2 + bc^2 \qquad = \sqrt{ac^2 + bc^2}$$

१.८ साहित्याचे पुनरावलोकन :

नागरी भूगोल इंग्रजीतील “ अर्बन जिओग्राफी” या शब्दाचे मराठीतील रूपांतर आहे. “अर्बन” हा शब्द लॅटीन भाषेतील ‘अर्ब्स‘ या शब्दापासुन बनलेला आहे. या शब्दाचा अर्थ शहरासंबंधी आहे. अशा प्रकारे नागरी भूगोल अथवा अर्बन जिओग्राफीचा अर्थ नागरी ठिकाणासंबंधी विवेचन असा होतो.

“हेरॉल्ड एम.मेअर” यांच्या मते, नगरंची रचना आणि त्यांचा एकमेकांशी असणारा संबंध तसेच नगरे व खरेदी यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे नागरी भूगोल होय. ग्रीफीत टेलर यांच्या मते “नगराचे सथान ” विकास व त्यांचे स्वरूप आणि नगरांचे प्रकार यांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे नागरी भूगोल होय.

रिस्तोफेन यांच्या मते, नागरी क्षेत्र एक संघटीत समुह असून त्यांचे मुख्य कार्य अद्योगधंदे व व्यवसायासंबंधीत आहे.जेथे कृषी कार्यांना कमी महत्व असते. अशा कार्याचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे नागरी भूगोल होय.

१.९ प्रकरण मांडणी:

प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्हयातील नागरीकांचा भौगोलीक अभ्यास खालील प्रकारणाव्दारे विभागला आहे.त्यांची मांडणी पुढील प्रमाणे करण्यात येत आहे.

प्रकरण पहिले : विषयाची ओळख

या प्रकरणामध्ये विषयाची प्रस्तावना नागरी भूगोलाचा अर्थ आणि व्याख्या नागरीकरण, अभ्यास क्षेत्र व विषय निवड, संषोधनाची महत्व, संषोधनाची उद्यिष्टे, आकडेवारी व संकलन स्त्रोत, संशोधन पध्दती,साहीत्याचे पुनरावलोकन इत्यादीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : प्राकृतीक सामाजिक घटकांचा आढावा

या प्रकरणामध्ये प्रस्तावना, अभ्यास क्षेत्राची प्रशासकीय माहिती, भूगर्भशास्त्रीय वितरण, भूरचना, मृदा प्रकार, हवामान, पर्जन्य वृष्टी, तापमान, नदी प्रणाली, लोकसंख्या, नैसर्गिक वनस्पती, खनिज संपत्ती, वाहतुक व संदेशवहन यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : नागरी लोकसंख्येची रचना

या प्रकरणात नागरी लोकसंख्येची वाढ, नागरी केंद्रानुसार वितरण, नागरी केंद्राची घनता, साक्षरता, लिंग गुणोत्तर, नगरांची वाढ, नागरी वाढ, नागरी केंद्रा नुसार लोकसंख्येचे वितरण, नागरीकरण यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : नागरी भूमीउपयोजन

या प्रकरणामध्ये नांदेड जिल्हयातील नागरी केंद्राचे भूमीउपयोजन यांचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे. यात उपग्रहाव्दारे घेतलेल्या प्रतिमांचा वापर करण्यरात येणार आहे.

प्रकरण पाचवे : नागरी भूमीउपयोजन

यात वस्तीचा अर्थ, व्याख्या, ग्रामीण वस्तीचे प्रारूपे, वस्तीचे प्रारूपांचे प्रादेशिक वितरण, वस्तीचे प्रकार

प्रकरण सहावे : नगर निमिर्ती व विकास

या प्रकरणामध्ये प्रस्तावना नगरांचा उदय व वाढ, नगरांच्या वाढीची कारणे, नगर रचना-पुनरूजीवन काळातील नगररचना, नगरांचा विकास

प्रकरण सातवे : नागरी समस्या व नगर नियोजन

या प्रकरणात पर्यावरण प्रदुषणाचा अर्थ, प्रकार, कारणे, उपाययोजना, नगर नियोजनाचा अर्थ, नगर नियोजनाची तत्वे, नगर नियोजनातील अडथळे, सारांष

प्रकरण आठवे : निष्कर्ष

या प्रकरणात संशोधनातून मिळाालेल्या निष्कर्षाची मांडणी करण्यात येणार आहे.

संदर्भ ग्रंथ सुची

1. Barkley and M.S. Heancy (1996) Big City Light and Small Towns- Confillets and Confluence, Center,for Community Economic Development. CEN Newsletter No. 237
2. R.C.Chandana (2002), Population Geography kalyani Piblishers, New Delhi.
3. District Cenus hand Books of Nanded District 1991 to 2011
4. B.N. Ghosh (1985), Fundamentrals of Population Geography.
5. R.B. Mandal (2000)
6. Singh P.B. (2011) Level of Urbanization in Varanashi and its 7adjoin district state of Utter pradesh.
7. ग्रामीण समस्या व नागरी प्रश्न, डॉ.सिध्दार्थ सोनवणे, शैलेश वाघ